स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता मंजूर करण्यासाठी राज्यातील शहरे / गावे यांचे पुनर्वर्गीकरण..........

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय, क्रमांक :घभाभ-१००५/प्र.क्र.१३/सेवा-५,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक: १७ जून, २००५.

पहा : (१) शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक : घभाभ-१०९३/७६/सेवा-५,दि.२ सप्टेंबर, १९९३

(२) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक : घभाभ-१०९८/प्र.क्र. ८२/९८/सेवा-५, दि. ११ डिसेंबर, १९९८

(३) शासन शुद्धिपत्रक,वित्त विभाग,क्रमांक : घभाभ-१०९८/प्र.क्र. ८२/९८/सेवा-५, दि. ५ जानेवारी, १९९९

(४) शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक : घभाभ-१०९९/प्र.क्र. ८१/९९/सेवा-५, दि. ७ सप्टेंबर, १९९९

(५) शासन परिपत्रक,वित्त विभाग,घभाभ-१००३/प्र.क्र.४५/सेवा-५,दि.१० नोव्हेंबर,२००३

(६) केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाची क्रमांक: २(२१)/ई.II.(बी)/२००४, दि.१८ नोव्हेंबर, २००४ व दि.१६ मार्च, २००५ ची ज्ञापने

शासन निर्णय

राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता मंजूर करण्यासाठी वर (२) येथे नमूद केलेल्या दिनांक ११ डिसेंबर, १९९८ च्या आदेशासोबतच्या "जोडपत्र-एक" आणि "जोडपत्र-दोन" अन्वये राज्यातील शहरांचे/ गावांचे वर्गीकरण दर्शविणारी यादी विहित केली आहे. सन २००१ च्या जनगणनेतून प्राप्त झ ालेल्या लोकसंख्येच्या आधारे केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांना स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता मंजूर करण्यासाठी शहरांचे/गावांचे वरील (६) येथील दिनांक १८.११.२००४ च्या आदेशांन्वये पुनर्वर्गीकरण केले आहे.त्या धर्तीवर राज्य शासनाने या प्रयोजनार्थ विहीत केलेले वर्गीकरण सुधारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. याविषयी शासन आता असे आदेश देत आहे की, वर (२) येथे नमूद केलेल्या दि. ११ डिसेंबर, १९९८ च्या आदेशासोबतची "जोडपत्र-एक" व "जोडपत्र-दोन" रद्द समजण्यात यावीत. त्याऐवजी आता स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता मंजूर करण्यासाठी या आदेशासोबतच्या अनुक्रमे "जोडपत्र-१ " व "जोडपत्र-२" अन्वये विहीत करण्यात आलेले शहरांचे / गावांचे वर्गीकरण अंमलात आले आहे असे समजण्यात यावे.

३. शासन असेही आदेश देत आहे की, वर (२) येथे नमूद केलेल्या दिनांक ११ डिसेंबर, १९९८ च्या आदेशातील परिच्छेद ३ अन्वये विहीत केलेल्या तरतूदीचा लाभ आता केवळ कोल्हापूर(ना.स.),नवी मुंबई (सी.टी.) या दोन क्षेत्रांना मिळेल. त्यामुळे, नवी मुंबई (सी.टी.)[म्हणजे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राबाहेरील नवी मुंबईचा भाग] या क्षेत्राचा स्थानिक पुरक भत्त्यासंदर्भातील या आदेशासोबतच्या वर्गीकरणात समावेश केलेला नसला आणि घरभाडेभत्त्यासंदर्भातील वर्गीकरणात "क" वर्ग क्षेत्रात समावेश केला असला तरी तेथे मुंबई (ना.स.) साठी लागू असणाऱ्या दराने स्थानिक पूरक भत्ता व घरभाडेभत्ता मंजूर करण्यात यावा. तसेच, घरभाडे भत्त्याच्या प्रयोजनार्थ कोल्हापूर शहराचे "क" वर्ग शहर हे वर्गीकरण या आदेशासोबतच्या वर्गीकरणातही कायम ठेवण्यात आले असले तरी, त्या शहरास "ब-२" वर्गाच्या शहरासाठी लागू असणा-या दराने घरभाडेभत्ता मंजूर करण्यात यावा.

शासन असेही आदेश देत आहे की, कामठी नागरी समूहातील कामठी (नगरपालिका) आणि कामठी (छावणी) या क्षेत्रासाठी "ब-१" वर्ग शहराच्या दराने स्थानिक पूरक भत्ता आणि घरभाडे भत्ता मंजूर करण्याविषयीची वर (१) येथे नमूद केलेल्या आदेशातील तरतूद यापुढेही चालू राहील.

४. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, ज्या-ज्या वेळेस राज्य शासन राज्यातील नगर परिषदांचे प्रशासनिक सोयीच्या दृष्टीकोनातून पुनर्वर्गीकरण करते, त्या-त्या वेळेस असे पुनर्वर्गीकरण करण्यात आलेल्या नगर परिषदांपैकी ज्यांना वरील वर्ग प्राप्त झाला आहे, अशा नगरपरिषदांच्या हद्दीत काम करणा-या कर्मचा-यांकडून नव्या वर्गीकरणानुसार सुधारित दराने घरभाडे भत्त्याची मागणी केली जाते. तसेच तेथील कार्यालयांकडून नव्या वर्गीकरणानुसार वाढीव दराने घरभाडे भत्ता प्रदान करण्याविषयी धारणा व्यक्त करुन शासनाचे मार्गदर्शन अपेक्षिले जाते. या विषयी शासनाने वरील (५) येथील आदेशांन्वये स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमित केल्या आहेत.

या संदर्भात पुन्हा स्पष्ट करण्यात येते की, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरकभत्ता मंजूर करण्यासाठी शासनाच्या वित्त विभागाच्या आदेशाद्वारे राज्यातील शहरांचे/गावांचे केलेले वर्गीकरण हे, प्रशासनिक सोयीच्या दृष्टीकोनातून शासनाच्या नगर विकास विभागाच्या आदेशाद्वारे नगर परिषदांच्या केलेल्या वर्गीकरणापासून सर्वस्वी भिन्न आहे. प्रशासनिक सोयीच्या दृष्टीकोनातून नगर परिषदांचे अंमलात असणारे वर्गीकरण बदलले तरी त्या बदलामुळे त्या ठिकाणी कार्यरत असणा-या कर्मचा-यांना मिळणा-या घरभाडे भत्त्याच्या वा स्थानिक पूरक भत्त्याच्या दरात कोणताही बदल होत नाही.

५. हे आदेश दि. १ एप्रिल, २००५ पासून अंमलात आले आहेत असे समजण्यात यावे. शहरांच्या / गावांच्या पुनर्वर्गीकरणामुळे स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्त्यावरील खर्चात वाढ होत असल्यास असा वाढीव खर्च मंजूर अनुदानातून भागवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मीना अ. जोशी
शासनाच्या उपसचिव

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र,नागपूर.
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनीट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
राज्यपालांचे सचिव.
मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव.
उप मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव.
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
मंत्रालयीन सर्व विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
संचालक, तांत्रिक प्रशिक्षण,द्धारा-तंत्र शिक्षण संचालक, मुंबई (२५० प्रती)
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी
आयुक्त, महानगरपालिका, नागपूर.
प्रशासकीय अधिकारी, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालिका शिक्षण मंडळे (पुणे/कोल्हापूर/सोलापूर या महानगरपालिकांची शिक्षण मंडळे यांसह)
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक (१० प्रती)
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य , पुणे (१० प्रती)
संचालक, आदिवासी संशोधन व शिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आदिवासी विकास आयुक्त, नाशिक.

*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
*सहसंचालक, ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट,मुंबई.
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
नगरविकास विभाग,यूडी-१०, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग(२० प्रती)
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/ औरंगाबाद/नाशिक/अमरावती
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली , जिल्हा रत्नागिरी.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (४० प्रती)
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (१०० प्रती)
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.
अपर आयुक्त, आदिवासी उपयोजना, नाशिक/नागपूर.
सर्व समाजकल्याण अधिकारी, वर्ग-१
सर्व आदिवासी कल्याण अधिकारी
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्प
कुलसचिव महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.
अधीक्षक, वेतन पथक, सर्व जिल्हे.
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उत्तर,दक्षिण व पश्चिम विभाग)
सर्व कन्याशाळा निरीक्षिका
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग)
शिक्षण अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
सर्व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड फाईल, वित्त विभाग-सेवा-५

जोडपत्र-१

स्थानिक पूरक भत्ता देण्यासाठी वर्ग "अ-१", "अ", "ब-१" व "ब-२" शहरे व त्यांच्या नागरी समूह घटक क्षेत्रांची यादी.

शहरांचे वर्गीकरण (१)	शहरांची/नागरी समूहांची नावे (२)	नागरी समूह घटक व त्यात येणारे क्षेत्र (३)
"अ-१"	मुंबई (ना.स.)	(१) बृहन्मुंबई (महानगरपालिका)
		(२) मीरा-भाईंदर (महानगरपालिका)
		(३) ठाणे (महानगरपालिका)
		(४) नवी मुंबई (महानगरपालिका)
		(५) कल्याण-डोंबिवली (महानगरपालिका)
		(६) उल्हासनगर (महानगरपालिका)
		(७) अंबरनाथ (एम)
		(८) कुळगाव-बदलापूर (एम)
"अ"	पुणे (ना.स.)	(१) पुणे (महानगरपालिका)
		(२) पुणे (छावणी)
		(३) खडकी (छावणी)
		(४) पिंपरी-चिंचवड (महानगरपालिका)
		(५) देहू रोड (छावणी)
		(६) देहू (सी.टी.)
	नागपूर (ना.स.)	(१) नागपूर (महानगरपालिका)
		(२) डिगडोह (सी.टी.)
		(३) वाडी (सी.टी.)
"ब-१"	नाशिक (ना.स.)	(१) नाशिक (महानगरपालिका)
		(२) एकलहरे (सी.टी.)
		(३) देवळाली (छावणी)
		(४) भगूर (एम)
"ब-२"	अमरावती (महानगरपालिका)	-
	औरंगाबाद (ना.स.)	(१) औरंगाबाद (महानगरपालिका)
		(२) औरंगाबाद (छावणी)
	भिवंडी (ना.स.)	(१) भिवंडी-निजामपूर (महानगरपालिका)
		(२) खोनी (सी.टी.)
	सोलापूर महानगरपालिका	
	कोल्हापूर (ना.स.)	(१) कोल्हापूर (महानगरपालिका)
		(२) गांधीनगर (सी.टी.)

ना.स. -नागरी समूह — ओ.जी.- आऊट ग्रोथ

सी.टी.- सेन्सस टाऊन — एम -नगरपालिका

जोडपत्र-२

घरभाडे भत्ता देण्यासाठी वर्ग "अ-१", "अ", "ब-१","ब-२" आणि "क"शहरे व त्यांचे नागरी समूह घटक क्षेत्र आणि गावांची यादी.

शहरांचे /गावांचे वर्गीकरण (१)	शहरांची/नागरी समूहांची नावे (२)	नागरी समूह घटक व त्यात येणारे क्षेत्र (३)
"अ-१"	मुंबई (ना.स.)	(१) बृहन्मुंबई (महानगरपालिका)
		(२) मीरा-भाईंदर (महानगरपालिका)
		(३) ठाणे (महानगरपालिका)
		(४) नवी मुंबई (महानगरपालिका)
		(५) कल्याण-डोंबिवली(महानगरपालिका)
		(६) उल्हासनगर (महानगरपालिका)
		(७) अंबरनाथ (एम)
		(८) कुळगाव-बदलापूर (एम)
"अ"	पुणे (ना.स.)	(१) पुणे (महानगरपालिका)
		(२) पुणे (छावणी)
		(३) खडकी (छावणी)
		(४) पिंपरी-चिंचवड (महानगरपालिका)
		(५) देहू रोड (छावणी)
		(६) देहू (सी.टी.)
	नागपूर (ना.स.)	(१) नागपूर (महानगरपालिका)
		(२) डिगडोह (सी.टी.)
		(३) वाडी (सी.टी.)
"ब-१"	नाशिक (ना.स.)	(१) नाशिक (महानगरपालिका)
		(२) एकलहरे (सी.टी.)
		(३) देवळाली (छावणी)
		(४) भगूर (एम)
"ब-२"	अमरावती (महानगरपालिका)	-
	औरंगाबाद (ना.स.)	(१) औरंगाबाद (महानगरपालिका)
		(२) औरंगाबाद (छावणी)
	भिवंडी (ना.स.)	(१) भिवंडी-निजामपूर (महानगरपालिका)
		(२) खोनी (सी.टी.)
	सोलापूर (महानगरपालिका)	
"क"	भुसावळ (ना.स.)	(१) भुसावळ (एम)
		(२) कंडारी (सी.टी.)

कामठी (ना.स.)	(१) कामठी (एम) (२) टेकाड (सी.टी.) (३) कन्हान पिंपरी (सी.टी.) (४) कामठी (छावणी)
यवतमाळ (ना.स.)	(१) यवतमाळ (एम) (२) उमरसरा (सी.टी.)
वसई (ना.स.)	(१) वसई (एम) (२) सांडोर (सी.टी.) (३) नवघर-माणिकपूर (एम)
श्रीरामपूर (ना.स.)	(१) श्रीरामपूर (एम) (२) श्रीरामपूर (ग्रामीण) (सी.टी.)
अहमदनगर (ना.स.)	(१) अहमदनगर (महानगरपालिका) (२) अहमदनगर (छावणी)
इचलकरंजी (ना.स.)	(१) इचलकरंजी (एम) (२) कबनूर (सी.टी.)
कोल्हापूर(ना.स.)	(१) कोल्हापूर (महानगरपालिका) (२) गांधीनगर (सी.टी.)
सांगली (ना.स.)	(१) सांगली मिरज आणि कुपवाड शहर (महानगरपालिका) (२) माधवनगर (सी.टी.)

नंदूरबार, शिरपूर-वरवाडे, धुळे महानगर-पालिका, चोपडा, जळगांव महानगरपालिका, अमळनेर, चाळीसगांव, शेगाव, मलकापूर (जि.बुलढाणा), खामगांव, बुलढाणा, अकोला महानगरपालिका, अकोट, कारंजा (जि.वाशिम), वाशिम, अंजनगांव सुर्जी, अचलपूर, वर्धा, हिंगणघाट, भंडारा, गोंदिया, भद्रावती, चंद्रपूर, बल्लारपूर, पुसद, वणी (जि.यवतमाळ), नांदेड-वाघाळा महानगरपालिका, हिंगोली, बसमतनगर (जि.हिंगोली), परभणी, जालना, मालेगांव महानगरपालिका, मनमाड, पालघर, विरार, नालासोपारा, नवी मुंबई (सी.टी.), खोपोली, लोणावळा, बारामती, संगमनेर, कोपरगाव, बीड, परळी वैजनाथ, अंबेजोगाई, लातूर, उदगीर, बार्शी, उस्मानाबाद, पंढरपूर, फलटण, सातारा, कराड, रत्नागिरी, इस्लामपूर (जि.सांगली),गडचिरोली,अलिबाग (जि.रायगड), ओरोस (जि.सिंधुदुर्ग)

ना.स. -नागरी समूह   ओ.जी.- आऊट ग्रोथ
सी.टी.- सेन्सस टाऊन   एम -नगरपालिका